**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः24.04.2025** **वार : गुरुवार**

---

**ठळक बातम्या,**

- पहलगाम हल्ल्यानंतर भारताची कठोर पावलं; पाकिस्तानबरोबरचा सिंधू जल करार केला स्थगित,
- वाघा-अटारी सीमा बंद; पाकिस्तानी नागरिकांना भारताचा व्हिसा देण्यावरही बंदी
- पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर आज नवी दिल्लीत सर्वपक्षीय बैठक
- पहलगाम हल्ल्यात मृत पावलेल्या डोंबिवलीतील तिघांना मुख्यमंत्र्यांकडून श्रद्धांजली; दोघांचं पार्थिव पुण्यात दाखल, आज सकाळी होणार अंत्यसंस्कार

आणि

- पुण्याच्या एफ.टी.आय.आय.ला अभिमत विद्यापीठाचा दर्जा प्रदान

**पहलगाम- सुरक्षा समिति निर्णय**

जम्मू आणि काश्मीरच्या पहलगाममध्ये मंगळवारी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानविरुद्ध कडक धोरण अवलंबलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी काल झालेल्या सुरक्षा विषयक मंत्रिमंडळ समिति अर्थात सी सी एस च्या बैठकीत एकंदर सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेण्यात आला तसंच सर्व सैन्यदलांना सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर सात महत्वाचे निर्णय घेण्यात आल्याची माहिती परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी काल नवी दिल्लीत प्रसार माध्यमांशी बोलताना दिली. या निर्णयानुसार भारत आणि पाकिस्तानदरम्यान असलेला, 1960 चा सिंधू पाणी करार तात्काळ प्रभावाने स्थगित करण्यात आला आहे. पाकिस्तान जोपर्यंत दहशतवादाला पाठिंबा देणं थांबवत नाही तोपर्यंत हा निर्णय लागू राहील. अटारी इथली एकात्मिक तपासणी चौकी अर्थात आय सी पी तात्काळ प्रभावाने बंद करण्यात आली आहे. 1 मे 2025 पर्यंत वैध प्रवास परवानगी असलेल्या पाकिस्तानी नागरिकांना या मार्गाने पाकिस्तानात परतण्याची परवानगी देण्यात आली आहे. या अंतिम मुदतीनंतर, भारत आणि पाकिस्तानमधील जमिनीवरील प्रवास पूर्णपणे स्थगित करण्यात येणार आहे. बैठकीत आणखी एक कठोर निर्णय घेण्यात आला, त्यानुसार, पाकिस्तानी नागरिकांसाठी सार्क व्हिसा सवलत योजना रद्द करण्यात आली आहे. पाकिस्तानी नागरिकांना सार्क सवलत योजना अर्थात SVES अंतर्गत यापुढे भारतात प्रवास करण्याची परवानगी दिली जाणार नाही; तसंच पाकिस्तानी नागरिकांना पूर्वी जारी करण्यात आलेले सर्व प्रकारचे SVES व्हिसा रद्द करण्यात आले आहेत. तसंच, सध्या या व्हिसा योजनेअंतर्गत भारतात असलेल्यांना पाकिस्तानी नागरिकांना देश सोडण्यासाठी 48 तासांची मुदत देण्यात आली आहे. राजनैतिक स्तरावर नवी दिल्लीतील पाकिस्तानी उच्चायुक्तालयातील संरक्षण, सल्लागारांना आठवडाभरात भारत सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत. याचबरोबर, भारताने इस्लामाबादमधील भारतीय उच्चायुक्तालयातून स्वतःचे संरक्षण, नौदल आणि हवाई सल्लागार मायदेशी परत बोलवण्याची घोषणा केली आहे. दोन्ही उच्चायुक्तांलयामधून या सेवा सल्लागारांच्या पाच सहाय्यक कर्मचाऱ्यांनाही काढून घेतले जाईल. भारताने इस्लामाबादमधील भारतीय उच्चायुक्तालय आणि नवी दिल्लीतील पाकिस्तानी उच्चायुक्तालयातील एकूण कर्मचाऱ्यांची संख्या कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. दोन्ही दूतावासांमधील

कर्मचाऱ्यांची संख्या सध्याच्या 55 वरून 30 पर्यंत कमी केली जाईल. ही कपात 1 मे 2025 पासून लागू केली जाईल.

**सर्वपक्षीय बैठक**

दरम्यान, पहलगाम दहशतवादी  हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने आज नवी दिल्लीत सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे.

**बैठक राजनाथ**

संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी काल तिन्ही दलांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन काश्मीर खोऱ्यातल्या परिस्थितीचा आढावा घेतला. या हल्ल्यातील दोषीना सोडणार नाही, त्यांना कठोर शासन केलं जाईल, इतकंच नव्हे तर पडद्यामागच्या सूत्रधारांनाही सोडणार नाही, असं राजनाथ सिंह यांनी बैठकीनंतर प्रसार माध्यमांना सांगितलं.

**शहा पहलगाम**

दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल पहलगाम इथं घटनास्थळाची पाहणी केली. या ठिकाणी झालेल्या हल्ल्यात 26 पर्यटकांचा मृत्यू झाला असून, मृतांमध्ये नौदल अधिकाऱ्यासह दोन परदेशी पर्यटकांचा समावेश आहे. या हल्ल्यात 20 पर्यटक जखमी झाल्याचं वृत्तसंस्थेनं म्हटलं आहे. शहा यांनी काल मृतांना श्रद्धांजली अर्पण केली तसंच मृतांच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचं सांत्वन केलं.

**पार्थिव-अंत्यसंस्कार**

जम्मू काश्मीरमधल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मरण पावलेल्या महाराष्ट्रातल्या सहा पर्यटकांच्या कुटुंबांना राज्य शासनानं प्रत्येकी पाच लाख रुपये मदत जाहीर केली आहे. जम्मू काश्मीर राज्य प्रशासनानंही या हल्ल्यातल्या मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी दहा लाख रुपये तर गंभीररीत्या जखमी झालेल्यांना प्रत्येकी 2 लाख रुपये मदत जाहीर केली आहे. दरम्यान पहलगाम हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या हेमंत जोशी, संजय लेले आणि अतुल मोने या तिघांवर काल रात्री डोंबिवलीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या तिघांच्या पार्थिवाचं अंत्यदर्शन घेतलं आणि त्यांच्या कुटुंबियांचं सांत्वन केलं.

पुण्याचे कौस्तुभ गनबोटे आणि संतोष जगदाळे तसंच नवी मुंबईचे दिलीप दिसले या पर्यटकांचाही या हल्ल्यात मृत्यू झाला आहे. कौस्तुभ गनबोटे आणि संतोष जगदाळे यांचं पार्थिव शरीर आज पहाटे पुण्यात आणण्यात आलं. त्यांच्यावर आज सकाळी साडे नऊच्या सुमारास अंत्यसंस्कार होणार आहेत.

काश्मीरमध्ये अडकलेल्या पर्यटकांना राज्यात सुखरुप परत आणण्याला शासनाचं प्राधान्य असल्याचं, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. काश्मीरमध्ये गेलेल्या महाराष्ट्रातल्या इतर पर्यटकांना परत आणण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात येत असल्याचंही फडणवीस यांनी सांगितलं. महाराष्ट्रातल्या पर्यटकांना सुरक्षित परत आणण्यासाठी विशेष विमानांची व्यवस्था करण्याची विनंती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केंद्र सरकारकडे केली आहे.

दरम्यान, पहलगाम इथे काल झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय नागरी विमानवाहतूक मंत्री के. राममोहन नायडू यांनी विमान कंपन्यांबरोबर तातडीची बैठक घेतली. विमान कंपन्यांना नियमित भाडे पातळी

राखण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांचे मृतदेह त्यांच्या मूळ राज्यात पोहोचवण्यासाठी पूर्ण सहकार्य करण्याचे निर्देशही नायडू यांनी विमान कंपन्यांना दिले. अतिरिक्त रेल्वे गाड्यांची व्यवस्थाही करण्यात आली आहे. तिकीट आरक्षित असलेल्या प्रवाशांना तिकिटात सवलत देण्यात आली असून वेळापत्रकात बदल झाल्यानंतर होणारा अतिरिक्त खर्चही घेण्यात आलेला नाही. तिकीटं रद्द करणाऱ्या प्रवाशांना रकमेची परतफेडही करण्यात येत आहे.

या दुर्घटनेत जखमी झालेल्या चार पर्यटकांशी संपर्क झाला असून ते सुखरूप असल्याचं राज्य प्रशासनानं सांगितलं आहे. जम्मू-काश्मीरमध्ये गेलेल्या इतर पर्यटकांची माहिती घेतली जात आहे.

जम्मू काश्मीरमध्ये अडकलेल्या सर्व नागरिकांना सुरक्षितरित्या महाराष्ट्रात परत आणण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मंत्री गिरीश महाजन जम्मू आणि काश्मीरमध्ये दाखल झाले आहेत. शिंदे यांनी काल काश्मीरमध्ये अडकलेल्या राज्यातील नागरिकांची भेट घेऊन संवाद साधला. दरम्यान, जम्मू काश्मीरमध्ये आपले परिचित गेले असतील, तर संबंधित जिल्हा प्रशासनाला त्याची माहिती देण्याचं आवाहन प्रशासनानं केलं आहे. महाराष्ट्रातल्या पर्यटकांसाठी राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागानं हेल्पलाईन सुरू केली आहे. हा मदत कक्ष चोवीस तास सुरू राहणार असून पर्यटक किंवा त्यांच्या नातेवाईकांनी 022-22027990 या क्रमांकावर संपर्क साधण्याचं आवाहन राज्य शासनाने केलं आहे.

**निषेध**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा काल राज्यात ठीकठिकाणी निषेध करण्यात आला. विविध राजकीय पक्षांनी या हल्ल्याचा निषेध केला तसंच हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांना श्रद्धांजली वाहिली.

**अभिमत विद्यापीठ**

केंद्रीय शिक्षण मंत्रालयानं पुणे इथली भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्था अर्थात एफ.टी.आय.आय. आणि कोलकत्यातल्या सत्यजित रे चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेला अभिमत विद्यापीठाचा दर्जा प्रदान केला आहे. या संदर्भातली अधिसूचना शिक्षण मंत्रालयानं काल जारी केली. विद्यापीठ अनुदान आयोगानं केलेल्या शिफारशीनुसार, या दोन्ही संस्थांना अभिमत विद्यापीठाचा दर्जा दिला गेल्याचं अधिसूचनेत म्हटलं आहे.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल झालेल्या सामन्यात मुंबई इंडियन्सने सनरायझर्स हैदराबादचा सात गडी राखून पराभव केला. हैदराबादानं दिलेले 144 धावांचं लक्ष्य मुंबई संघानं पंधरा षटकं आणि चार चेंडूतच गाठलं. ट्रेन्ट बोल्टनं मुंबई संघासाठी चार गडी बाद केले त्याला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आलं. दरम्यान, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने कालच्या सामन्यादरम्यान पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील बळींना श्रद्धांजली वाहिली. तसंच खेळाडू, समालोचक आणि इतर कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून निषेध नोंदवला.

**हवामान**

सांगली जिल्ह्यातील काही भागात काल मेघगर्जनेसह जोरदार पाऊस झाला. वादळी वाऱ्यामुळ काही ठिकाणी विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला होता. राज्यात अन्यत्र उन्हाची काहिली वाढली असून काल सर्वात जास्त कमाल तापमान चंद्रपूर इथं 45 पूर्णांक 8 दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. येत्या 24 तासात मध्य

महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**